फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १५६(३) व १९० मध्ये सुधारणा केलेल्या अधिनियमाच्या अंमलबजावणीबावत....

३६९/७

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक पत्र क्र. सुधारणा-०३१५/प्रक्र.१९/विशा-९
मादाम कामा मार्ग,हतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-३२,
दिनांक :- ४ नेव्हेंबर,२०१६.

संदर्भ -१) सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनयिम क्रमांक ३३
मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ३० ऑगस्ट २०१६ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम.
२) फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा)अधिनियम २०१५
गृह विभागाची दिनांक २७ ऑक्टोबर २०१६ ची अधिसूचना.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १५६ (३) मधील तरतूदीनुसार लोकसेवकाविरूध्द न्यायालयात अनेक तक्रारी दाखल करण्यात येतात. या तक्रारीमध्ये ब-याच तक्रारी वस्तुस्थितीवर आधारीत नसतात. या तक्रारींमध्ये काही तक्रारी ह्या प्रामाणिक व चांगले काम करणाऱ्या लोकसेवकांविरूध्दही असतात. अशा तक्रारींमुळे लोकसेवकांना त्यांची शासकीय कर्तव्य बजावताना अनेक वेळा नाहक त्रास सहन करावा लागतो व कित्येक प्रकरणांत त्यांचे मानसीक खच्चीकरण देखील होत असते.

याबाबी विचारात घेऊन फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१५ पारीत करण्यात आला आहे. सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीचा प्रारंभ दिनांक १ नोव्हेंबर २०१६ असा नियत केलेला आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१५ मधील तरतूदीच्या कलम ३ च्या परंतुकांमध्ये अशी तरतूद आहे की, " मंजूरी प्राधिकरी मंजूरीसाठी प्रस्ताव मिळाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या कालावधीच्या आत त्यावर निर्णय करील,

आणि मंजूरी प्राधिकाऱ्यांने उक्त विनिर्दिष्ट ९० दिवसांच्या कालावधीच्या आत निर्णय न केल्यास त्याबाबतीत, मंजूरी प्राधिकाऱ्यांकडून मंजूरी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ".

सुधारित अधिनियमातील तरतुदींप्रमाणे मंजूरीच्या अर्जावर/ प्रस्तावावर ९० दिवसांत निर्णय करणे बंधनकारक आहे आणि जर विहित ९० दिवसांच्या कालावधीत निर्णय झाला नाही तर मंजूरी प्राधिकाऱ्याने मंजूरी दिली असे मानण्यात येणार आहे. पर्यायाने विहित मुदतीत निर्णय न झाल्यास प्रस्तुत सुधारणेचा हेतू विफल होईल.

मा. सर्वोच्च न्यायालयाने साकेरी वासु वि. उत्तर प्रदेश सरकार व इतर या प्रकरणात दिनांक ०७.१२.२००७ च्या निर्णयात खालीलप्रमाणे निरीक्षणे नोंदविली आहेत :-

"In this connection we would like to state that if a person has a grievance that the police station is not registering his FIR under section 154 Cr.P.C. then he can approach the Superintendent of Police under Section 154 (3) Cr.P.C. by an application in writing. Even if that does not yield any satisfactory result in the sense that either the FIR is still not registered, or that even after registering it no proper investigation is held, it is open to the aggrieved person to file an application under Section 156 (3) Cr.P.C. before the learned Magistrate concerned."

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रियंका श्रीवास्तव व इतर वि. उत्तर प्रदेश सरकार व इतर या प्रकरणी दिनांक १९.०३.२०१५ रोजी दिलेल्या निर्णयातील परिच्छेद २७ मध्ये खालील प्रमाणे निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

"We have already indicated that there has to be prior application under section 154(1) & 154(3) while filing a petition under section 156 (3). Both the aspects should be clearly spelt out in the application and necessary documents to that effect shall be filed"

वर नमूद अधिनियमातील तरतूदी तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील प्रकरणात नोंदविलेली निरीक्षणे तसेच या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालय यांनी वेळोवेळी पारीत केलेले आदेश इ. बाबी विचारात घेऊन, मंजूरी प्राधिकाऱ्यांनी मंजूरीसाठी आलेल्या प्रस्तावावर विहित मुदतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. मंजूरी प्राधिकाऱ्यांने त्यांच्याकडे प्राप्त प्रकरणातील कागदपत्रे व इतर पुरावा या बाबींचा बारकाईने गुणवत्तेवर

तपासणी करून तपासणीअंती प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने दखल घेण्यासाठी मंजूरी देणे योग्य आहे, अशा निष्कर्षाप्रत आल्यानंतर त्याप्रमाणे जाणीपूर्वक निर्णय विहित मुदतीत घ्यावा. एखाद्या प्रकरणात एकापेक्षा अधिक लोकसेवकांविरूध्द प्रस्ताव प्राप्त झाल्यास, मंजूरी प्राधिका-याने प्रत्येक लोकसेवकाबाबत कारणे नमूद करून, स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

या सर्व बाबी विचारात घेऊन प्रत्येक मंजूरी प्राधिकाऱ्याने अशी प्रकरणे ९० दिवसांच्या आत निर्णय घेऊन निकाली काढावीत. याकरीता मंजूरी प्राधिकाऱ्याने आवश्यकतेनुसार त्यांच्या अधिनस्त जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करावी व अशा प्रकरणांचा वेळोवेळी आढावा घ्यावा व निर्णय विहित मुदतीत करून संबंधितांना कळवावा. मंजूरीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाचा/प्रस्तावाचा दिनांक, त्यावरील केलेल्या निर्णयाचा दिनांक या बाबींची सविस्तर माहिती मंजूरी प्राधिकाऱ्याकडे ठेवावी.

सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील सुचनांचे पालन करावे तसेच वरील सूचना त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(के.पी.बक्षी)
अपर मुख्य सचिव(गृह)

प्रति,

विरोधी पक्ष नेता, दोन्ही सभागृह,
सर्व विधान मंडळ/ संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,महाराष्ट्र राज्य,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवंचे स्वीय सहायक.
पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य
पोलीस आयुक्त,मुंबई
मुख्य सचिवांचे वरिष्ठ स्विय सहायक,
सर्व मंत्रालयीन विभाग,
गृह विभागातील सव सह/उप सचिव/अवर सचिव / सर्व कार्यासने.
निवड नस्ती, कार्यासन विशा-९.